स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखेतंर्गत मराठी विषयातील पीएच.डी.
(विद्यावाचस्पती) संशोधनाचा संक्षिप्त रूपरेषा

~: संशोधन विषय :~

"मराठी कादंबरीवर आधारित मराठी चित्रपटांचा तौलनिक अभ्यास"

(१९७० ते २०१५)

~: संशोधक :~

प्रा. देवसाळे आदिनाथ गुलाबचंद

एम.ए., बी.एड. (मराठी)

हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स, अशोक चौक, सोलापूर

~: मार्गदर्शक :~

प्रा. डॉ. शिवानंद गिरी

(मराठी विभाग)

भाई किशनराव देशमुख महाविद्यालय, चाकूर

ता. चाकूर जि. लातूर

"मराठी कादंबरीवर आधारित मराठी चित्रपटांचा तौलनिक अभ्यास" (१९७० ते २०१५)

१) प्रस्तावना :-

मराठी साहित्याचे दालन अत्यंत समृद्ध असून यामध्ये कथा, कविता, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, प्रवासवर्णन आणि कादंबरी या साहित्य प्रकाराचा समावेश होतो. त्यामुळेच मराठी साहित्याची परंपरा फार जुनी व प्रदीर्घ असल्याची दिसते. कादंबरीला आज एक प्रमुख साहित्य प्रकार म्हणून जागतिक लोकप्रियता लाभली असली तरी तिचा विकास प्रथमतः पाश्चात्य देशातच झाला. इंग्रजी साहित्याच्या अनुकरणातून मराठी साहित्यात कादंबरी हा साहित्य प्रकार आलेला आहे. मराठी साहित्यात कादंबरी हा वाङ्मय प्रकार आधुनिक वाङ्मय प्रकार म्हणूनच ओळखला जातो. कादंबरी या वाङ्मय प्रकारात समाज जीवनाचे चित्रण होत असल्याने समाजाचा दस्तऐवज म्हणूनच त्याकडे पाहिले जाते. तसेच समाज जीवनात कादंबरी या साहित्य प्रकाराला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. कार्यकारण श्रृंखला बद्दल आशा कल्पित कथानकाद्वारे मानवी जीवनाचे यथार्थ दर्शन कादंबरीतून घडविले जाते. मराठी कादंबरीचे स्वरूप संमिश्र असून या साहित्य प्रकारात कथानक, व्यक्तिचित्रण, घटना, प्रसंग, वातावरण निर्मिती, संवाद व भाषाशैली इत्यादी घटकांचा समावेश होतो. कादंबरी हा साहित्यप्रकार काळानुरूप बदलेला असला तरी त्या त्या काळानुरूप समाज जीवनाचे चित्रण कादंबरीत उमटलेले दिसून येते.

मराठी कादंबरीत दलित, ग्रामीण, आदिवासी, भटके, स्त्रीवादी व जनवादी अशा विविध प्रकारच्या मानवी समुह जीवनांचे आणि त्यांच्या समस्यांचे चित्रण झालेले आहे. अशा या समुहमनाचे चित्रण मराठी कादंबरीत झालेले असल्याने मराठी कादंबरीवर आधारित अनेक चित्रपट निघाले. आज मराठी चित्रपट निर्माते, दिग्दर्शक सकस आणि सशक्त अशा कादंबरीवर आधारित चित्रपट निर्मिती करुन मराठी न समजणाऱ्या व्यक्तीच्याही काळजाला भिडण्याची ताकत आजच्या मराठी चित्रपटाने केल्याचे दिसून येते. आज २१ व्या शतकात मराठी वाचन संस्कृती कमी होत चालल्याची ओरड होत असताना मराठी कादंबरीवर आधारित मराठी चित्रपटांना मात्र चांगले दिवस आल्याचे दिसून येते.

मराठी चित्रपटांना सशक्त संहिता मिळत नाहीत म्हणून कादंबरीसारख्या साहित्यकृतीची निवड केली जाते. कादंबरीवर आधारित चित्रपट बनविण्याचा सिलसिला त्या त्या कादंबरीला

नवे परिमाण, नवा दृष्टीकोन आणि नव्या पिढीशी संवादाचे माध्यम म्हणूनही त्याकडे पाहिले जाते.

२) विषय निवडीची भूमिका :-

कादंबरी वाचन करणे आणि चित्रपट पाहणे हा संशोधकाचा आवडीचा विषय, छंद आहे. त्यामुळेच मराठी कादंबरीतून आलेले सर्वांगीण समाज जीवन आणि मराठी कादंबऱ्यावर आधारित निर्माण झालेल्या चित्रपट आणि कादंबऱ्यांचा अभ्यास करण्यासाठी आणि आजच्या भविष्यात या संशोधनाचा समाजाला कसा फायदा करुन देता येईल या दृष्टीकोनातून शोध घेण्यासाठी प्रस्तुत विषय संशोधकाने संशोधनासाठी निवडला आहे.

कादंबरी ही केवळ सुशिक्षित लोकांनाच वाचता येते. जे लोक अशिक्षित व अज्ञानी आहेत त्यांना कादंबरी वाचनाच्या मर्यादा येतात. परंतु मराठी कादंबऱ्यावर आधारित चित्रपटांची निर्मिती झाल्यावर अशिक्षित व अज्ञानी लोकांना कादंबरी मधले संपूर्ण जीवन दृश्य-श्राव्य माध्यमामुळे संपूर्णतः आकलन होते. म्हणूनच कादंबरी वाङ्मय प्रकाराच्या मर्यादा आणि चित्रपटाचे समाज जीवनातील महत्त्व काय आहे याचा शोध आणि बोध घेण्यासाठी प्रस्तुत विषय संशोधनासाठी हाती घेतला आहे.

मराठी माणसामध्ये मराठी भाषेविषयी आणि मराठी चित्रपटाविषयी अस्मिता २१ व्या शतकात कमी झाल्याचे दिसून येते. त्याचे कारण म्हणजे आज जागतिकीकरण, आधुनिकीकरण, प्रसार माध्यमाचा झंझावात आणि इंग्रजी, हिंदी भाषा आणि त्या भाषेतील निर्माण झालेले विविध चित्रपट यामुळे मराठी चित्रपटाचा दर्जा घसरलेला दिसतो. परंतु आज २१ व्या शतकात मराठी दिग्दर्शकांनी दर्जेदार अशा मराठी कादंबरीवर आधारित चित्रपटाची निर्मिती केल्याचे दिसून येते. त्यामुळेच कादंबरीचे कथानक आणि चित्रपटातील पटकथा, संवाद, पार्श्वगायनांचा शोध घेण्यासाठी प्रस्तुत विषय संशोधनासाठी निवडलेला आहे.

३) संशोधन विषयाचे महत्त्व :-

संशोधन करणे हे आधुनिक काळाची गरज आहे. कारण संशोधनामुळे विषयाची सखोल माहिती आपणांस मिळते. प्रस्तुत विषयाचे संशोधन करीत असताना कादंबरीकाराने मांडलेला

समाज जीवनाचा आरसा आणि कादंबऱ्यावर आधारित चित्रपटाचे दिग्दर्शकाने केलेली निर्मिती आणि त्यातून समाजात केलेले प्रबोधन आणि संशोधकाच्या संशोधनाचा समाजाला फायदा होण्यासाठी संशोधन केले जाईल.

४) संशोधन विषयाचे उद्दिष्टे :-

१. कादंबरी हा वाङ्मय प्रकार प्राधान्य प्रभावातून कसा उदयाला आला याचा शोध घेणे.

२. कार्यकारण श्रृंखलाबद्दल अशा कल्पित कथानकाच्याद्वारे मानवी जीवनाचे यथार्थ चित्रण करणाऱ्या मराठी कादंबरीचा शोध घेणे.

३. मराठी चित्रपट निर्मितीचा इतिहास आणि वाटचालीचा वेध घेणे.

४. मराठी कादंबरीतील व्यक्तिरेखा आणि चित्रपटातील साकारलेल्या व्यक्तिरेखांचाअभ्यास करणे.

५. मराठी कादंबरीचे प्रतिबिंब मराठी चित्रपटात जसेच्या तसे पडले आहे का ? याची मीमांसा करणे.

६. मराठी कादंबरी आणि मराठी चित्रपटातील सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक आणि धार्मिक जीवनाचा शोध घेणे.

७. मराठी कादंबरीचे कथानक आणि चित्रपटातील पटकथा लेखन व संवादाचा अभ्यास करणे.

८. मराठी कादंबरी आणि मराठी चित्रपट यांच्यातील साम्यभेद शोधणे.

९. मराठी कादंबरीचे आणि मराठी चित्रपटाचे वाङ्मयीन मूल्यमापन करणे.

१०. मराठी कादंबरीवर आधारित चित्रपट निर्मिती करताना दिग्दर्शकाने येणाऱ्या अडचणी व उपायांचा शोध घेणे.

५) विषयाची व्याप्ती :-

प्रस्तुत विषयाचे संशोधन करीत असताना मराठी कादंबऱ्यावर आधारित जे मराठी चित्रपट १९७० ते २०१५ पर्यंत निर्माण झाले त्या चित्रपटांचा आणि कादंबऱ्यांचा अभ्यास केला जाईल. त्यामुळे संशोधन विषयाची व्याप्ती, अभ्यास क्षेत्र व्यापक असल्याचे दिसून येते.

६) संशोधन विषयाच्या मर्यादा :-

प्रस्तुत विषयाचे संशोधन करत असताना मराठी कादंबऱ्यावर आधारित अनेक मराठी चित्रपटे निघालेली आहेत.मराठी चित्रपटाची वाटचाल आजपर्यंत आघाद असलेली दिसते. परंतु संशोधनात सर्वच मराठी कादंबऱ्यावर आधारित चित्रपटांचा अभ्यास करणे येथे आवश्यक नाही. त्यामुळे १९७० ते २०१५ पर्यंतच्या निवडक मराठी कादंबरी लेखकांच्या कादंबऱ्या आणि त्या निवडक कादबरीवर प्रदर्शीत झालेल्या निवडक चित्रपटांचा अभ्यास संशोधनात केला जाईल. मराठी कादंबरीवर निघालेल्या मराठी चित्रपटाचांच आढावा प्रस्तुत संशोधन प्रबंधात घ्यावयाचा आहे ही संशोधनाची मर्यादा आहे.

७) संशोधन विषयाचे साधने / सामुग्री :-

प्रस्तुत विषयाचे संशोधन करीत असताना १९७० ते २०१५ पर्यंतच्या कादंबऱ्या, साह्यभूत संदर्भ ग्रंथ सूची, वर्तमान पत्रे, नियतकालिके, मासिके, दिवाळी अंक, साप्ताहिक आणि इतर साहित्याचा वापर करुन संशोधन केले जाईल. या शिवाय इंटरनेट, चित्रपट पाहणे, विश्वकोश, मराठी कादंबऱ्यावरील समीक्षणे, परिक्षणे, आवश्यक वाटल्यास लेखक आजच्या काळातील चित्रपट कलावंत, दिग्दर्शक, निर्माता आणि तज्ज्ञ मार्गदर्शक यांच्याशी सुसंवाद करुन संशोधन कार्य पूर्ण केले जाईल.

८) संशोधन पद्धती :-

प्रस्तुत शोध प्रबंधात मराठी कादंबऱ्यावर आधारित जे चित्रपट निर्माण झाले त्याचा अभ्यास करताना ग्रंथालयीन संशोधन पद्धती, ऐतिहासिक संशोधन पद्धती, विश्लेषणात्मक संशोधन पद्धती, तुलनात्मक आणि सर्वेक्षणात्मक संशाधन पद्धती आदिंचा वापर करुन संशोधन केले जाईल.

याशिवाय कादंबरीचे लेखक, चित्रपटातील कलाकार, दिग्दर्शक, निर्माते यांच्या मुलाखती घेतना प्रश्नावली तयार करुन संशोधन केले जाईल.

प्रकरण पहिले :- मराठी कादंबरीची वाटचाल :-

कांदबरी हा 'आधुनिक' साहित्यप्रकार आहे. मराठी साहित्याचे दालन अत्यंत समृद्ध असून इतर साहित्यप्रकारापेक्षा कादंबरी हा साहित्य प्रकार पाश्चात्य वाङ्मयाच्या प्रभावातून कसा जन्माला

आला याचा अभ्यास करणे.कादंबरी या वाङ्मय प्रकाराची एकच एक उणीव विरहित व्याख्या आपणाला करता येणार नाही. परंतु कादंबरीच्या ज्या व्याख्या ज्या अभ्यासकाने केलेल्या आहेत त्या व्याख्येच्या आधारे कांदबरीची संज्ञा स्पष्ट केली जाईल. तसेच कादंबरीचे स्वरूप स्पष्ट केले जाईल. कादंबरी या वाङ्मय प्रकाराची सुरूवात बाबा पद्मनजी यांच्या 'यमुना पर्यटन' (इ.स. १८५७) या कादंबरी पासून झालेली असली तरी मराठी कादंबरीचे स्वरूप हे बदलत गेल्याने कादंबरी वाङ्मयाच्या प्रकारामध्ये आशय आणि अभिव्यक्ती यामध्ये कमालीचे बदल झालेले आहेत. व्यक्ती आणि समाज यांच्या संबंधात अनेक प्रश्न निर्माण होत असतात. त्यांच्या संदर्भात निश्चित नैतिक भूमिका घेऊन कादंबरीकाराला काही सांगावे वाटते. 'यमुना पयर्टन' या पहिल्याच कादंबरीत अशी कृतिप्रधानता समर्थपणे चालवित आहेत. कादंबरी हे लेखकाने निर्मिलेले कल्पित रूप असते. कादंबरीतून प्रामुख्याने मानवी मन, मानवी जीवन चित्रित होत असते कादंबरी ही विशिष्ट व्यक्तीच्या संदर्भात आणि विशिष्ट कालावधीत घडलेली एक भाषिक घटना असते. म्हणून विशिष्ट कलावकाशात घडणाऱ्या घटनांची एक मालिका कादंबरीतून उलगडत जाते. विस्तीर्ण मानवी जीवनाचे पट उलगडून तळाशी असलेले सत्य शोधून काढण्याचे कार्य कादंबरीकार कांदबरीतून करीत असतो. कादंबरीत विषय, कथानक, सुसंघटीत पात्रे, व्यक्तिदर्शन, प्राकृतिक पार्श्वभूमी, सामाजिक पार्श्वभूमी, अद्‌भूतरम्यता, स्थळकाळविशिष्ट पार्श्वभूमी, सामाजिक ऐतिहासिक व वास्तविक घटकांचा आंतर्भाव कादंबरीतून अवतरत असतो. कादंबरी वाङ्मय प्रकारातून जीवनातील समग्रदर्शन कसे घडते आणि मराठी कादंबरीची पार्श्वभूमी, परंपरा, स्वरूप, घटक व मराठी कादंबरीचे आजतागायतची वाटचाल या सर्व घटकांचा परामर्श पहिल्या प्रकरणात केला जाणार आहे.

प्रकरण दुसरे : मराठी कादंबरी आणि मराठी चित्रपट यातील भेद :-

गतीचित्राच्या आशय आणि आविष्कारात होत गेलेल्या सापेक्ष बदलामुळे चित्रपट ही सामाजिक आणि सांस्कृतिक एकसंघ कलाकृती म्हणून स्थिर होऊ लागली. मुलतः भांडवलदारांच्या गुंतवणुकीचा समतोल ताळेबंद राखणाऱ्या या कलेला अधिक समाजभिमुखतेमुळे चौकटीमधील अर्थशास्त्रीय संकल्प लावले गेले. व्यावसायिक दृष्टी आणि गुंतवणुकीच्या मोबदल्यात हव्या तशा भरपूर फायद्याकरता ही कला विस्तृत झाली. मराठी चित्रपटसृष्टीची सुरूवात पहिला बोलपट

'अयोध्येचा राजा' या चित्रपटापासून सुरू झाली. बोलपटानंतर भारतीय चित्रपटामध्ये मराठी भाषेमध्ये चित्रपटांची निर्मिती व इतिहास याचा वेध घेतला जाईल. मराठी भाषेत चित्रपट हा प्रकार महत्वपूर्ण समजला जातो. मराठी चित्रपट निर्मितीचे स्वरूप स्पष्ट करत मराठी कादंबरी आणि त्यावर प्रदर्शित मराठी चित्रपट कसे वेगळे आहेत याचा शोध घेतला जाईल.

दादासाहेब फाळके यांनी मराठी चित्रपटसृष्टीची व पर्यायाने भारतीय चित्रपटसृष्टीची मुहूर्तमेढ रोवली. मराठी चित्रपटसृष्टी अलीकडच्या काळात पुन्हा भरभराटीला आली. मराठी चित्रपटांना सध्या खूप चांगले दिवस आले आहेत. उत्तमोत्तम मराठी चित्रपट प्रदर्शित होत आहेत. हे चित्र खरच खूप सुखावह व भुषणावह आहे. 'श्वास' नंतर मराठी चित्रपटांनी जणू कात टाकली. त्यानंतर अनेक उत्तम चित्रपट येथे येऊन गेले आणि अजूनही अशा उत्तम चित्रपटांची निर्मिती सध्या चालू आहे. या आधुनिक मराठी चित्रपट निर्मितीचा धांडोळा सदरील प्रकरणात घेतला जाईल.

प्रकरण तिसरे : मराठी कादंबरीवरील चित्रपटांचे स्वरुप :-

१९७० ते २०१५ पर्यंतच्या मराठी कादंबरी आणि मराठी कादंबऱ्यावरील चित्रपटांचे स्वरुप. चित्रपटातील सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक आणि सांस्कृतिक चित्रण रेखाटण्याचा प्रयत्न प्रस्तुतच्या प्रकरणातून केला जाईल. तत्कालीन समाज जीवनाचे वर्णन व कादंबरीत मांडले गेलेले विविध विषय चित्रपटांतून प्रेक्षकांच्या समोर येतात.तत्कालीन समाज, पुरूष प्रधान संस्कृती, राजकीय डावपेच, आर्थिक समस्या, धार्मिक जीवन याचेही स्वरुप या प्रकरणातून रेखाटले जाईल.

प्रकरण चौथे : मराठी कादंबरीतील व्यक्तिरेखा आणि चित्रपटात साकारलेल्या व्यक्तिरेखा :-

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मराठी कादंबरीतील चित्रण रेखाटण्याचा प्रयत्न प्रस्तुतच्या प्रकरणातून केला जाईल. तत्कालीन समाज हा अशिक्षित आणि अंधश्रद्धाळू आहे. पुरूष प्रधान संस्कृतीमुळे स्त्रीचे स्थान हे समाजात दुय्यम दर्जाचे आहे. समाजाने स्त्रीकडे नेहमीच अबला म्हणून पाहिलेले आहे. अशा या स्त्री व्यक्तिरेखेचे ही चित्रण या प्रकरणातून केले जाईल.

मराठी कादंबरीतील स्त्री, पुरूष आणि खल व्यक्तिरेखा चित्तारलेली आहे. याचा धांडोळा

या प्रकरणात घेतला जाईल. तसेच मराठी कादंबरीतील व्यक्तिरेखांची भूमिका याचा तौलनिक अभ्यास एकंदरीत स्त्री, पुरूष, खल व्यक्तिरेखा आणि कलावंतानी साकारलेली भूमिका याचा आढावा या प्रकरणाच्या माध्यमातून घेतला जाईल. मराठी कादंबरीतील व्यक्तिरेखा आणि चित्रपटात साकरलेल्या व्यक्तिरेखा यांचा अभ्यास या प्रकरणात केला जाईल.

प्रकरण पाचवे : मराठी कादंबरी आणि मराठी चित्रपटांचा तौलनिक अभ्यास :-

मराठी भाषेतील इतर साहित्यप्रकारा पैकी कादंबरी हा साहित्य प्रकार महत्वपूर्ण समजला जातो. मराठी चित्रपटांना सशक्त संहिता मिळत नाहीत म्हणून कादंबरीसारख्या साहित्याकृतीचे माध्यमांतर केले जात आहे. कादंबरीवर चित्रपट बनविण्याचा कादंबरीला नवे परिणाम आणि नव्या पिढीशी संवादाचे माध्यम देण्याचा व मराठी कादंबरी लेखकाचा कादंबरीतील जीवनानुभव व्यक्त करण्याचा प्रयत्न केला जात आहे. मूळ कादंबरी ही अनेक भावभावनाचे अत्यंत गडद पदर असते जे चित्रपटांसाठी उलगडवणे हे दिग्दर्शक व कादंबरीचे दृश्य माध्यमात रूपांतर करताना 'न्याय' ही संकल्पना विशेषत्वाने विचारात घ्यावी लागते. किमान सातशे ते आठशे पानांच्या कादंबरीचे सिनेमात रूपांतर करताना ही संकल्पना अनेकदा अत्यंत अवघड घटक म्हणून समोर येते. या समस्यांचा अभ्यास या प्रकरणातून केला जाईल.

कादंबरीवर चित्रपट काढताना फार अवघड आणि क्लिष्ट समस्या निर्माण होतात. प्रत्यक्ष कादंबरी ही केवळ शब्दरूपात असते. त्या कादंबरीला दृश्यांचा पट म्हणून जेव्हा एखादा दिग्दर्शक त्या कादंबरीचे चित्रपटात रूपांतर करताना, आशय मांडायचा असतो. हे करताना कादंबरीमध्ये मुख्य विषय कोणता आहे, त्यातली पटकथा, कथा, गीत आणि संवाद ठरवताना दिग्दर्शकाला अडचणी निर्माण होतात त्या अडचणींचा शोध या प्रकरणातून घेतला जाईल. कादंबरीवर चित्रपट तयार करताना येणारी अडचण म्हणजे कादंबरीवरून चित्रपट करताना कादंबरीतील घटनांचा क्रम. हा क्रम कादंबरीत जसा आहे तसाच चित्रपटात घेता येत नाही. एखाद्या पात्राची लांबी कादंबरीत आहे तितकीच ठेवता येत नाही. मराठी चित्रपटातील कलावंतांच्या समस्यांचा आढावा या प्रकरणातून घेतला जाईल.

प्रकरण सहावे : मराठी कादंबरीवर आधारित चित्रपटांचे मूल्यमापन :-

एखाद्या गाजलेल्या साहित्याकृतीवर विशेषतः कादंबरीवर चित्रपट बनवण्याची प्रथा सध्या

मराठी सिनेसृष्टीत पाहायला मिळत आहे. या निमित्ताने प्रेक्षकांना मोठ्या पडद्यावर उत्तमोत्तम कादंबऱ्यांचा रसास्वाद घेता येऊ लागला आहे. अर्थात ही दोन्ही वेगवेगळी माध्यम आहेत.

प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने कादंबरीची भाषा, मराठी कादंबरीचा आशय व अभिव्यक्ती चित्रपटातील व्यक्तिरेखा, स्वभावाचे विविधांगी पैलू, पात्रांची एकमेकांशी संवाद साधण्याच्या पद्धती, घटना व प्रसंग निर्मिती, संवाद, निवेदन शैली, वातावरण निर्मिती, भाषा, भाषाशैली, मराठी कादंबरी व मराठी चित्रपट यांच्यातील साम्यभेदाचा तुलनात्मक अभ्यास करून मराठी कादंबरीवर आधारित चित्रपटांचे वाङ्मयीन मूल्यमापन भाषाभ्यासाच्या दृष्टिकोनातून आढावा या प्रकरणातून घेतला जाईल.

प्रकरण सातवे : उपसंहार

प्रस्तुत विषयाच्या शोध प्रबंधामध्ये प्रत्येक प्रकरणामध्ये केलेले संशोधन आणि संशोधनाअंती काढलेले निष्कर्ष याची तपशीलवार मांडणी या प्रकरणात केली जाणार आहे. मराठी कादंबरीचा उगम व विकास, मराठी चित्रपट निर्मितीची वाटचाल मराठी कादंबरी व चित्रपटातील जीवन, मराठी कादंबरीतील व्यक्तिरेखा व चित्रपटातील कलावंत, मराठी कादंबरीवर चित्रपट निर्मिती करतानाच्या समस्या व उपाययोजना आणि मराठी कादंबरीवर आधारित चित्रपटाचे वाङ्मयीन मूल्यमापन अशा पहिल्या प्रकरणापासून ते शेवटच्या प्रकरणापर्यंतचा ओझरता आढावा, वाचन, मनन, चिंतन करुन अभ्यासपूर्ण संशोधन प्रस्तुत प्रकरणात केले जाईल आणि निष्कर्ष या प्रकरणात नोंदवले जातील.

परिशिष्टे :-

प्रस्तुतचा आराखडा हा संकल्पित असून संशोधनाला गती येईल त्यावेळी त्यात अपरिहार्यपणे बदल होणे संभवनीय आहे. या संशोधन विषयासाठी पुढील साधन सामुग्रीचा वापर केला जाईल.

आधारभुतग्रंथ, संदर्भग्रंथ, नियतकालिके, दैनिके, संशोधन शोधपत्रिका, मुलाखती, प्रश्नावली, छायाचित्र, अप्रकाशितप्रबंध, इंटरनेट इत्यादी.

मराठी कादंबरी आणि मराठी चित्रपट निर्मितीचा कालखंडनिहाय सूची

अ. क्र.	**कादंबरीचे नाव**	**कादंबरीचे लेखक**	**कादंबरी कालखंड**	**चित्रपट**	**चित्रपट निर्मितीचा कालखंड**	**दिग्दर्शक/ निर्माता**
१	महानंदा	जयवंत दळवी	१९७०	महानंदा	१९८५	के. जी. कोरगांवकर
२.	शाळा	मिलिंद बोकील	१९७०	शाळा	२०११	सुजय डहाके
३	पार्टनर	व.पू.काळे	१९७६	पार्टनर	२०१३	समीर सुर्वे
४	बेघर	शांता निसळ	१९७६	उंबरठा	१९८२	जब्बार पटेल
	७२ मैल प्रवास	अशोक व्हटकर	१९७९	७२ मैल प्रवास	२०१३	राजीव पाटील
६	नटरंग	आनंद यादव	१९८०	नटरंग	२०१०	रवी जाधव
७	जौळ	रत्नाकर मतकरी	१९८०	माझं घर माझा संसार	१९८६	राजदत्त
८	दुनियादारी	सुहास शिरवळकर	१९८२	दुनियादारी	२०१३	संजय जाधव
९	भंडार भोग	राजन गवस	१९८८-	जोगवा	२००९	राजीव पाटील
१०	चौंडक दर्शन	चारुता सागर	८४			
११	पांगिरा	विश्वास पाटील	१९९०	पांगिरा	२०११	राजीव पाटील
१२	भस्म	उत्तम बंडू तुपे	१९९१	भस्म	१९९४	पुरुषोत्तम बडे
१३	सत ना गत	राजन खान	१९९९	सत ना गत	२०१३	राजु पार्सोकर
१४	निशानी डावा आंगठा	रमेश इंगळे	२००५	निशानी डावा आंगठा	२००९	पुरुषोत्तम बर्डे
१५	शेलारखिंड	बाबासाहेब पुरंदरे		सर्जा	१९८७	राजदत्त

संदर्भ ग्रंथ सूची :-

१. देसाई वसंत शांताराम - कलावंताचा सहवासात

२. आपटे शांता - जाऊ मी सिनेमात ?

३. रायकर ग. का. - सिनेमातील गोड गाणी

४. भगत भाई - नामांकित नट - नटी

५. शिंदे माधव कृष्णाजी - सिनेमा शास्त्र व तंत्र

६. भालेकर वसंत - सिने कलावंत

७. व्हटकर नामदेव - चित्रपट रसग्रहण अर्थात सिनेमा कसा पहावा ?

८. रावडे श्रीकांत - चित्रपट कसा तयार होते ?

९. नाडकर्णी ज्ञानेश्वर - भारतीय चित्रपट सृष्टीतील नवप्रवाह

१०. ख्याजा महमद आब्बास - चित्रपट निर्मिती

११. चव्हाण प्रताप एस - पडद्यामागील चित्रपट कलावंतांच्या गुज गोष्टी

१२. दीक्षित विजय - चित्रपट एक कला

१३. पाठक सी. वा. - फिरता सिनेमा

१४. कुलकर्णी रा. बा. - माझ्या कलावंतानो

१५. पाटील दिनकर - रूपेरी पडदा तंत्र व मंत्र

१६. गंधे योगेश्वर - सिनेमा सिनेमा

१७. शेवाळे माधव - भारतीय चित्रपट

१८. डॉ. खांडगे मंदा - पाऊल खुणा रुपेरी दुनियेच्या

१९. राणे अशोक - सिनेमाची चित्तरकथा

२०. दामले अरुणा - मराठी चित्रपट संगीताची वाटचाल

२१. मांढरे सूर्यकांत - गाथा मराठी चित्रपट सृष्टीची

२२. बोजेवार श्रीकांत - वास्तवदर्शी चित्रपट

२३.   महाम्बरे गंगाधर - मौलिक मराठी चित्रगीते

२४.   देशपांडे कुसुमाती - मराठी कादंबरीचे पहिले शतक

२५.   गोडबोले वापर - मराठी कादंबरी तंत्र व विकास

२६.   पोतदार मधु - मराठी चित्रपटांची सूची

२७.   इसाक मुजावर - गाथा मराठी सिनेमाची

(टीप : प्रस्तुत संशोधनात संशोधनाला गती येईल त्या आधारे आवश्यक त्या ठिकाणी बदल होणे संभवनीय आहे.)

संशोधक
प्रा. आदिनाथ गुलाबचंद देवसाळे
हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स,
अशोक चौक, सोलापूर

मार्गदर्शक
प्रा. डॉ. शिवानंद गिरी
भाई किशनराव देशमुख महाविद्यालय,
चाकूर ता. चाकूर जि. लातूर